अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. २८ जून २०२४ । वर्ष : २२ वे । अंक : २६९ वा । किंमत : ५ रुपये । पाने १२


## मनोज जरांगेंच्या गावात मराठा-ओबीसी भिडले

**बीड :** मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या मातोरी (ता. शिरूरकासार) या गावात मराठा आणि ओबीसी यांच्यात राडा झाला. डीजे वाजविण्यावरून दोन्ही गटांनी एकमेकांवर दगडफेक केल्याने अनेकांची डोके फुटली असून वाहनांचेही नुकसान झाले आहे. ही घटना गुरुवारी रात्री ८ वाजता घडली.

रात्री १०:३० वाजेपर्यंत गावात तणावपूर्ण शांतता होती. पोलिसांची कुमक गावात पोहोचली होती. सर्वांना शांतता ठेवण्याचे आवाहन केले जात होते. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी (जि. जालना) येथे जरी उपोषण केले असले तरी त्यांचे मूळ गाव हे शिरूर तालुक्यातील मातोरी आहे. वडिगोद्री येथे उपोषणास बसलेले प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे गोपीनाथ गडावरून पाडळसिंगीमार्गे भगवानगडावर जाणार होते. त्यांचे स्वागत करण्यासह त्यांना भगवानगडाकडे नेण्यासाठी मातोरी परिसरातील माळेगाव, पारगाव, तिंतरवणी आदी गावांतील ओबीसी बांधव हे डीजे लावून पाडळशिंगीकडे निघालेले होते. मातोरीत आल्यानंतर डीजेवर काही गाणे वाजवले. यावर मातोरी गावातील काही लोकांनी डीजे बंद करा, गाणे वाजवू नका असे सांगितले. हे बोलत असतानाच त्यांच्यात शाब्दिक वाद झाले. त्यानंतर याचे रूपांतर दगडफेकीत झाले. यामध्ये दोन्ही गटांचे लोक जखमी झाले आहेत. तसेच गाणे वाजवलेला डीजे आणि काही दुचाकींचीही तोडफोड करण्यात आली आहे. ही घटना समजताच चकलांबा, शिरूर, गेवराई पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मातोरी गावात धाव घेतली. तसेच दंगल नियंत्रण पथक व इतर विशेष पथकेही गावात दाखल झाली होती.



# ‘ठाकरी’ बाण्याने ‘दोस्ती’चा मनसुबा उधळला

- कुणी पेढा दिला
- कुणी चॉकलेट दिले
- हास्याचे फवारे उडाले

**सुराज्य/मुंबई**

**राज्य विधीमंडळाच्या अधिवेनात पहिल्याच दिवशी महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात जोरदार खडाजंगी होईल, असे वाटले होते परंतु चित्र उलटेच दिसले. विशेष म्हणजे सकाळी सकाळी विधी मंडळात मागील भाजप-शिवसेना युतीच्या नेत्यांमध्ये अचानक प्रेम उफाळून आले. कुणी एकमेकांना पेढा भरवला. कुणी एकमेकांना चॉकलेटही दिले.विनोद आणि कोपरखळ्यांनी हास्याचे फवारे उडाले. हे प्रेम असेच राहू द्या,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या प्रेमाचा रंग पाहून महाविकास आघाडीतील नेत्यांच्या भुवया उंचावल्या गेल्या. पहिल्यांदा दादांची आणि दुसऱ्यावेळेस देवेंद्र यांची उद्धव ठाकरेंशी भेट जुळून आल्याने भाजप-शिवसेना यांची पुन्हा युती होण्याचे संकेत मिळत होते.लोकसभा निवडणुकीत दारूण पराभव झाल्यानंतर भाजप नेते ठाकरे यांच्याशी पुन्हा जुळवून घेत दोस्ती करू पहात आहेत.पण उद्धव यांच्या ठाकरी बाण्याने भाजपच्या मैत्रीचा मनसुबा उधळला गेला.**

त्याचे असे की, लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी संपल्यानंतर आणि विधानसभेचे अधिवेशन सुरु होण्याअगोदर भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची विधिमंडळात भेट झाली. यावेळी दोन्ही नेते हसतखेळत एकमेकांशी बोलले. त्यांच्यात काही मिनिटांसाठी संवाद झाला. तुमचे असेच प्रेम कायम राहू द्या,अशी अपेक्षा उद्धव मंत्री चंद्रकांतदादांकडे व्यक्त केली.

चंद्रकांतदादा हे विधिमंडळातील विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंच्या भेटीला त्यांच्या केबिनमध्ये पोहोचले. यावेळी पाटील यांनी दानवेंना पुष्पगुच्छ दिला. विशेष म्हणजे यावेळी पाटलांनी ठाकरे गटाच्या अनिल परब यांचे अभिनंदन केले. कालच पदवीधरची निवडणूक झाली. त्याजा परब उमेदवार होते. विशेष म्हणजे यात परबांसमोर भाजपचा उमेदवार होता. पाटील यांनी परब यांचे ॲडव्हान्समध्ये अभिनंदन केल्याची चर्चा आहे. पाटील यांनी दानवेंसाठी चॉकलेट आणले होते. यावेळी दानवेंनी पाटलांना पेढा दिला. आम्ही लोकसभेला ३१ जागा जिंकल्या. त्यामुळे पेढे वाटतोय, अशी कोपरखळी दानवेंनी मारली.

पाटील यांनी पेढा घेतला. त्यावर असेच प्रेम कायम राहू द्या, असे उद्धव म्हणाले. बसा आमच्यासोबत, गप्पा मारुया, असा आग्रह ठाकरेंनी केला. पूर्वनियोजित कार्यक्रम असल्याने ते तिथून निघून गेले.



**लिफ्टला कान नसतात... :** विधिमंडळाच्या पार्श्वभूमीवर ठाकरेंनी विधिमंडळात पत्रकार परिषद घेतली. लिफ्टमधील भेटीचा विषय काढल्यानंतर ठाकरे म्हणाले की, फडणवीस यांची भेट योगायोगाने झाली. पाटील ंचीही भेट झाली. फडणवीसदेखील भेटले. 'नाना करते प्यार तुम्ही से कर बैठे' असे या भेटींमध्ये काही नाही. भिंतीला कान असतात. तसे लिफ्टला नसतात. त्यामुळे यापुढे सगळ्या गुप्त बैठका तिथेच घ्यायला हव्यात, असे मिश्किल भाष्य त्यांनी केले. महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण, यावर महायुतीच्या अपयशाचा धनी कोण ते आधी त्यांना ठरवू दे, असे ठाकरे म्हणाले. महाविकास आघाडीचा चेहरा महाराष्ट्र,अशा शब्दात ठाकरी शैलीत उद्धव यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर दिल्याने जुळून येणाऱ्या प्रेमाला अखेर तडे बसले.

**एकच हशा पिकला :** चंद्रकांतदादा केबिनमधून निघत असताना दानवेंनी त्यांना चॉकलेटची आठवण करुन दिली. दादा, माझे चॉकलेट राहिले, असे दानवे म्हणताच केबिनमध्ये एकच हशा पिकला. पाटील यांनी दानवेंना चॉकलेट दिले आणि तिथून निघाले. लोकसभा निवडणुकीतील प्रचारामुळे राज्यातील वातावरण तापले होते. नेत्यांनी एकमेकांवर जोरदार टीका केली होती.





मुंबई : उध्दव ठाकरे-फडणवीस लिफ्टच्या प्रतिक्षेत. चंद्रकांत पाटील, उध्दव ठाकरे यांच्या भेटीतील स्मितहास्य.

**भुवया उंचावल्या गेल्या...** विधिमंडळातील लिफ्टजवळ ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस येऊन थांबले. एकमेकांसमोर आल्यानंतर कोणीही कोणाला टाळले नाही, उलट त्यांनी एकमेकांसोबत संवाद साधला. नक्कीच यावेळी फडणवीस आणि ठाकरेंमध्ये फार चर्चा झाली नसली तरी त्यांनी एकमेकांकडे दुर्लक्षही केले नाही. त्यांची आजची समोरासमोर झालेली भेट पाहता ती कटुता आता कमी होतेय की काय असा प्रश्न उपस्थित होतो आहे. त्यांच्या या भेटीने महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या नेत्यांच्या भुवया नक्की उंचावल्या असतील.

**सुखद प्रसंगाचा असाही योगायोग... :** विधिमंडळात गुरूवारी एक सुखद चित्र पाहायला मिळाले. भाजप आणि शिवसेना वेगळे झाल्यापासून सतत एकमेकांवर टीका करणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे विधानभवनात एकत्र दिसून आले. विधानभवनाच्या लिफ्टसमोर त्यांची भेट झाली आणि ते लिफ्टमधून एकत्रच चर्चा करत सभागृहात गेले. त्यांनी कामकाजावर चर्चा केल्याची माहिती आहे. गेल्या काही दिवसात राज्यात घडलेल्या राजकीय घडामोडी पाहता हे दृश्य पाहायला मिळेल याची शक्यता फार कमी होती.

**याला आधी बाहेर काढा! :** ठाकरे-फडणवीस हे लिफ्टमध्ये जाण्याअगोदर तुम्ही दोघे सोबत छान दिसता,असे लिफ्टजवळचे कोणीतरी म्हटले. यानंतर पुढच्या काही क्षणांत लिफ्ट आली. ठाकरे आणि फडणवीस लिफ्टमध्ये जात होते. त्यावेळी ठाकरेंनी भाजप आमदार प्रवीण दरेकरांकडे बोट दाखवत याला आधी बाहेर काढा, असे म्हटले. त्यावर दरेकरांनी तुमचे अजून समाधान झाले नाहीए का? तुम्ही एकत्र प्रवास करणार असाल तर मी बाहेर पडतो. तुम्ही सोबत जा, असे मिश्किलपणे दरेकरांनी ठाकरेंना उत्तर दिले.

**मुख्यमंत्र्यांनी दिला टोला :** लिफ्टप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगेच प्रतिक्रिया दिली. कोणी लिफ्ट मागितली तरी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यापर्यंत ती पोहचू शकणार नाही, असा टोला शिंदे यांनी ठाकरे यांना लगावला. त्यांना (उद्धव ठाकरे) लिफ्टने शिफ्ट केल्यामुळे आम्ही जनतेच्या लिफ्टमध्ये आलो आणि महाराष्ट्रातील जनतेच्या मनातले सरकार स्थापन केले, असे मुख्यमंत्री म्हणाले.मुख्यमंत्र्यांचे दालन सहाव्या मजल्यावर आहे.

## विधानसभेच्या तालिका अध्यक्षपदी आ.अवताडे

**सोलापूर :** पंढरपूर-मंगळवेढ्याचे भारतीय जनता पक्षाचे आमदार समाधान आवताडे यांना प्रमोशन मिळाले असून पक्षाने त्यांची विधानसभेच्या तालिका अध्यक्षपदाची वर्णी लावली आहे. आहे. प्रथमच आमदार म्हणून निवडून आलेल्या आवताडे यांच्यासाठी ती मोठी संधी मानली जात आहे. समाधान आवताडे यांच्या अगोदर या मतदारसंघाचे आमदार भारत भालके यांनी तालिका अध्यक्ष म्हणून काम केले आहे.



विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन गुरूवारपासून सुरू झाले आहे. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभा अध्यक्षांची तालिका अध्यक्ष म्हणून पाच जणांची निवड जाहीर केली आहे. विधानसभेचे तालिका अध्यक्ष म्हणून भाजपकडून दोघांना संधी देण्यात आली, तर राष्ट्रवादी काँग्रेस, एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि काँग्रेसच्या एका आमदाराची वर्णी लावण्यात आली आहे. तालिका अध्यक्ष म्हणून भाजपकडून आमदार कालिदास कोळंबकर, समाधान आवताडे, शिवसेना शिंदे गटाकडून संजय शिरसाट तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून किरण लहामटे आणि काँग्रेसकडून अमिन पटेल या पाच आमदारांची निवड तालिका अध्यक्ष म्हणून करण्यात आली आहे.

## ‘नीट’परीक्षा घोटाळा फेम जाधव मास्तरला घरचा रस्ता



**सुराज्य/सोलापूर**

राज्यभर गाजत असलेल्या नीट परीक्षा पेपर फुटी प्रकरणातील संशयित आरोपी आणि माढा तालुक्यातील टाकळी (टें) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक संजय जाधव याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी गुरुवारी ही कारवाई केली.

दरम्यान, निलंबन कालावधीत जाधव याला माळशिरस मुख्यालय देण्यात आले आहे. नीट परीक्षा पेपर फुटी प्रकरणी लातूर पोलिसांनी माढा तालुक्यातील टाकळी जिल्हा परिषद शाळेचा प्राथमिक शिक्षक संजय जाधव याला अटक केली आहे. या संदर्भात बुधवारी (२६ जून) रोजी लातूर पोलिसांकडून सोलापूर जिल्हा परिषदेला या संदर्भात अहवाल प्राप्त झाला. या अहवालानुसार जाधव याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. नीट प्रकरणात अडकल्यामुळे जाधव याचे निलंबन झाले असल्याने त्याची माढा तालुक्यातून अक्कलकोट तालुक्यात झालेली विनंती बदली ही साहजिकच रद्द झाली आहे.

> लातूर पोलिसांनी केलेला कारवाईचा अहवाल आल्यानंतर आरोपी शिक्षक संजय जाधव यायावर निलंबनाची कारवाई झाली आहे. जाधव याच्या निलंबनाचे आदेश मुख्यकार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी गुरुवारी काढले आहेत. निलंबन काळात त्यास माळशिरस मुख्यालय देण्यात आले आहे.
>
> **- कादर शेख,**
> प्राथमिक शिक्षणाधिकारी

## प्रणिती शिंदेंसह ७ आमदारांचा राजीनामा अध्यक्षांकडे सुपूर्द



**सुराज्य/सोलापूर**

राज्याच्या पावसाळी अधिवेशनाला गुरूवारपासून सुरुवात झाली आहे. १४ व्या विधानसभेचे हे शेवटचे अधिवेशन आहे. विधानसभा निवडणुकिच्या तोंडावर होणाऱ्या या अधिवेशनाला विशेष महत्त्व आहे. विधानसभेचे ७ आमदार लोकसभा निवडणुकीत निवडून आल्यामुळे ते संसदेत गेले आहेत. त्यामुळे त्यांना विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागला.

यामध्ये शहर मध्यच्या आमदार प्रणिती शिंदे यांचा समावेश आहे. त्यांनी आपला राजीनामा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सुपूर्द केला. अधिवेशनाच्या सुरूवातील विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ज्या आमदारांनी राजीनामा दिला, अशा आमदारांची नावे सभागृहात वाचून दाखवली. राजू पारवे वगळता ज्या आमदारांनी राजीनामा दिला आहे, ते सर्व आमदार लोकसभा निवडणुकीत निवडून आल्यामुळे ते संसदेत गेले आहेत. त्यामुळे त्यांना विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागला. यामध्ये प्रणिती शिंदे, निलेश लंके, बळवंत वानखेडे यांच्यासह ८ आमदारांचा समावेश आहे. राजू पारवे यांनी काँग्रेस सोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यांनी आमदारकीचा राजीनामा देऊन, लोकसभा निवडणूक लढवली होती. रामटेक मतदारसंघातून त्यांनी लोकसभा निवडणूक लढवली मात्र त्यांचा पराभव झाला. महाराष्ट्रातील ७ आमदार लोकसभेवर निवडून गेले आहेत.

**● राजीनामा दिलेल्या सदस्यांची माहिती**

प्रणिती शिंदे - (शहर मध्य विधानसभा), राजू पारवे - (उमरेड विधानसभा) निलेश लंके - (पारनेर विधानसभा), बळवंत वानखेडे (दर्यापूर विधानसभा), प्रतिभा धानोरकर (वरोरा विधानसभा), संदिपान भुमरे (पैठण विधानसभा), रवींद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व विधानसभा), वर्षा गायकवाड (धारावी विधानसभा).

**● ‘या’ आमदारांचा लोकसभेला पराभव?**

राम सातपुते (भाजप) - सोलापूर, सुधीर मुनगंटीवार (भाजप) - चंद्रपूर, मिहिर कोटेचा (भाजप) - ईशान्य मुंबई, यामिनी जाधव (शिवसेना शिंदे गट) - दक्षिण मुंबई, विकास ठाकरे (काँग्रेस) नागपूर लोकसभा, रवींद्र धंगेकर (काँग्रेस) कसबा लोकसभा, शशिकांत शिंदे (शरद पवार गट) - सातारा लोकसभा, महादेव जानकर (रासप) - परभणी लोकसभा.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर :** बाणेगाव (ता.उत्तर सोलापूर) येथे एका ३० वर्षीय तरुणाने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना काल बुधवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. शाम विष्णू यादव (वय ३० रा.मनोहर नगर झोपडपट्टी,सोलापूर) असे मयताचे नाव आहे. काल सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह बाणेगाव शिवारातील कारंबा पंपहाऊस जवळ असलेल्या लिंबाच्या झाडाला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार चव्हाण पुढील सभास करीत आहेत.

### सुनील नगरात तरुणाचा मृत्यू

**सोलापूर :** सुनीलनगर परिसरातील श्रीराम मार्बल दुकानाजवळ संगणणा उर्फ संगप्पा सिद्राम चानकोटी (वय २८ रा.साईबाबा चौक) हा तरुण मृत अवस्थेत आढळून आला. ही घटना आज गुरुवारी दुपारी दीड वाजेच्या सुमारास उघडकीस आली. तो सुनील नगर येथे बेशुद्ध अवस्थेत आढळला होता. त्याला पोलिसांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो मयत झाल्याचे निष्पन्न झाले. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही. हवालदार शेख पुढील तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हम को भी लिफ्ट करा दे !


| कल्याण |
| --- |
| 130-47-115 |

| मुंबई |
| --- |
| 144-97-458 |


# चार्जिंग स्टेशनचा ई-बस धावण्याला ‘ब्रेक’

**● अजून सहा महिने धूर ओकत धावणार एसटी बस**

**सुराज्य/सोलापूर**

राज्य परिवहन महामंडळाच्या सोलापूर आगारातून ६३ ई-बस विविध मार्गांवर धावणार आहेत. तथापि, त्यांच्या धावण्याला साधारण अजून सहा महिन्यांचा ‘ब्रेक’ लागणार आहे. त्याला कारणदेखील तसेच आहे. बार्शी, पंढरपूर, मंगळवेढा या आगारांमधील चार्जिंग स्टेशनची कामं या वर्षाअखेर पूर्ण होतील. तद्नंतर बसची चार्जिंगची सोय झाल्यानंतर ई-बस धावण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. ई-बस मधून आरामदायी प्रवास होण्यासह प्रदूषण रोखण्याला अजून सहा महिने लागणार आहेत. तोपर्यंत जुनाट व कालबाह्य झालेल्या एसटी बस धूर ओकत धावणार आहेत.

सोलापूर शहरासह अन्य मोठ्या आगारातून जवळपास ७०० लालपऱ्या प्रवाशांसाठी धावतात. सोलापूर मध्यवर्ती विभागाला ६३ ई-बस येणार आहेत. ई-बसच्या मार्गावरील चार्जिंगची व्यवस्था करून या नव्या ई -बस गाड्या येथील. बार्शी, पंढरपूर, मंगळवेढा या आगार मध्ये येणार असल्याचे वाहतूक विभागाकडून सांगण्यात आले. सध्या चार्जिंग स्टेशनची कामे सुरु आहेत, ती पूर्ण झाल्यानंतर नव्या ई-बस प्रवाशांच्या सेवेत येतील.





**नऊ आगारांकडे असणाऱ्या बस गाड्यांचा तपशील**

सोलापूर- ११६, करमाळा - ७०, अकलूज -६२, बार्शी - १०५, पंढरपूर - १०४, सांगोला - ५७, कुर्डूवाडी -५८, अक्कलकोट -७२, मंगळवेढा - ६२

**● ‘या’ आगाराकडे येणार नवीन ई-बस**

सोलापूर मध्यवर्ती बसस्थानका मध्ये नऊ आगार आहेत. एसटीचा प्रवास हा सोयीस्कर असल्याने, सध्या एसटी बसेस कमी अन् प्रवासी जास्त असे चित्र पाहायला मिळत आहे. जिथे कमी गाड्या आहेत, म्हणजेच सोलापूर, बार्शी, पंढरपूर, मंगळवेढा या आगारामध्ये यावर्षी नव्या ई-बसेस येणार आहेत.



**● येथे होणार चार्जिंग स्टेशन**

बसच्या मार्गावरील चार्जिंगची व्यवस्था करून या नव्या ई-बस गाड्या येथील. बार्शी, पंढरपूर, मंगळवेढा सध्या चार्जिंग स्टेशनचे काम पूर्णपणे झाल्यानंतर या नव्या ई बस येथील.

**आकडे बोलतात**

- सोलापूसह अन्य आगारातून धावणाऱ्या बस : ७००
- चालक संख्या : १ हजार ६१९
- वाहक सख्या : १ हजार २११
- जुन्या गाड्या : ६७०
- नव्या गाड्या : ३०
- इलेक्ट्रिक : ९

**‘या’ मार्गावर शिवशाही बस**

एसीची सुविधा असलेल्या शिवशाही गाड्यांचे तिकीट दर थोडे जास्त आहेत. सोलापूर - पुणे, सोलापूर - हैदराबाद,पंढरपूर -पुणे, अक्कलकोट - पुणे या मार्गावर शिवशाही बस धावताहेत.